पुण्यनगरी दि. 22/01/2023

# स्थागुशा ॲक्टीव्ह मोडवर; अनेक गुन्ह्यांची उकल



**नांदेड/प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या धोरणानुसार शहरातील गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध मोहिमा सुरु आहेत. त्याच प्रमाणे गुन्हे घडले असतील तर त्याची उकल करणे महत्त्वाचे आहे. अशा प्रकारात गुन्हेगारांना जेरबंद करुन त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात यावा व फिर्यादीला मुद्देमाल द्यावा, असे आदेश दिले आहेत. या पार्श्वभुमीवर स्थागुशा ॲक्टीव्ह मोडवर आली असून त्यांनी केलेल्या कारवाईत एकास जेरबंद करुन त्याच्याकडून २ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थागुशाला मिळालेल्या गुप्त माहितीवरुन शहरातील ग्यानमाता शाळेसमोरील रस्त्यावर २१ जानेवारी २०२३ रोजी सापळा रचुन शेख सरवर शेख अथर (२०, रा.गाडीपुरा, नांदेड) यास ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने व त्याच्या इतर ३ साथीदारांनी २ लाख ७० हजार रुपयांचे १५ मोबाईल चोरल्याची त्याने कबुली दिली. या प्रकरणात विमानतळ पोलीस ठाण्यात ३३६/२२ नुसार गुन्हा दाखल आहे.

या आरोपीला विमानतळ पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपीकडून इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी सांगितली.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, पो.ना. बालाजी तेलंग, दीपक पवार, विठल शेळके, पो.कॉ. विलास कदम, गणेश धुमाळ, महेश बडगु सायबर ब्रॅंचचे राजु सिटीकर, दीपक ओढणे यांनी ही कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या पथकातील कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# गुरुद्वाऱ्यात दहशतवादी हल्ला; नांदेड पोलिसांची रंगीत तालीम







**नांदेड/प्रतिनिधी**

शहरात धार्मिक स्थळावर अचानक हल्ला झाल्यास उद्भवणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी नांदेड पोलीस दल सज्ज असावे. नांदेड परिक्षेत्राच्या पोलीस उप महानिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी येथील गुरूद्वारा परिसरात दहशतवादी हल्ला झाल्यावर त्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी रंगीत तालीम घेतली.

या रंगीत तालीमीत गुरूद्वारा गेट नंबर ३ येथील रूम नंबर ४६ मध्ये कांही यांत्रेकरूना दहशतवाद्यांनी बंदिस्त केल्या बाबतची माहिती मिळाली. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. प्रभावी कार्यवाहीसाठी नियंत्रण कक्षाची जबाबदारी पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांना देण्यात आली. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचे नेतृत्वाखाली अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सर्व मोहिमेची सुत्रे आपल्या हातात घेवुन वेगवेगळी पथके तयार केली. स्थानिक पोलीसाच्या मदतीने तात्काळ नाकाबंदी करून प्रत्यक्ष कार्यवाहीमध्ये प्रशिक्षीत क्युआरटी व आरसीपीचे जवान व अधिकाऱ्यांच्या मदतीने दहशतवादी हल्ला झालेल्या ठिकाणी तातडीने हजर होऊन खोलीत लपुन बसलेल्या ३ दहशतवाद्यांना ताब्यात घेवुन बंदिस्त केलेल्या यात्रेकरूंना सुखरूप बाहेर काढले.

या ऑपरेशन मध्ये पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक चंद्रसेन देशमुख, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, वजिराबादचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक नितीन काशीकर, भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक सुधाकर आडे, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक माणिक बेंद्रे, नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी लष्करे, संतोष शेकडे, दहशतवादी सेलचे पोलीस उपनिरीक्षक मारोती दासरे, विठ्ठल घोगरे, जलद कृती दलाच्या जवान व अंमलदारांनी सहभाग नोंदविला. अचानक घडलेल्या घटनेमुळे काही काळ स्थानिक नागरीक व यात्रेकरू गोंधळले होते. परंतु त्यांना माहिती देण्यासाठी तेथे पथक ठेवण्यात आले होते. त्यांच्या मार्फत रंगीत तालीमीबद्दल माहिती देण्यात आली.